# जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स निराभिमा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, शहाजीनगर, मुक्काम पोस्ट-रेडनी, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाच्या ३०.० किलो लिटर प्रतिदिन ते १०५.० किलो लिटर प्रतिदिन विस्तारीकरण प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक ऑनलाईन जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त

| | | |
|---|---|---|
| जाहिर जनसुनावणी दिनांक | - | ०२-०७-२०२१ |
| वेळ | - | दुपारी १२.०० वाजता |
| जनसुनावणी स्थळ | - | व्हिडीओ कॉन्फरन्सिंग झूम ॲप व्दारे |

प्रस्तावनाः-

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स निराभिमा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, शहाजीनगर, मुक्काम पोस्ट-रेडनी, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाच्या ३०.० किलो लिटर प्रतिदिन ते १०५.० किलो लिटर प्रतिदिन विस्तारीकरण प्रकल्पासाठी पर्यावरण अनुमती मिळविण्यासाठी अर्ज केला.

त्याअनुसार पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ३१-१०-२०१९ रोजी काही अटी व शर्ती निर्देश करुन मानक पर्यावरण आघात रुपरेषा करण्यास (स्टॅंडर्ड टीओआर-टर्म्स ऑफ रेफरन्स) प्राथमिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रं. बीओ/जेडी(ड्ब्लुपीसी/पीएच/बी-२१०६२५/एफटीएस-०२२१, दिनांक २५-०६-२०२१ व्दारे सदर जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, पुणे, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष,**

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) -**सदस्य**

१) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे - **समन्वयक**

जनसुनावणी बैठकीत सादर करण्यात आलेली निवेदने, मप्रनि मंडळ कार्यालयास प्राप्त झालेली निवेदने व हजेरीपट सोबत जोडत आहोत.

जनसुनावणीचे इतिवृत्तः-

श्री प्रताप जगताप, उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-१, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. जयश्री कटारे, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री नितीन शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प अधिकारी, पर्यावरण तज्ज्ञ व ऑनलाईन उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत करुन मा अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणीची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना माहिती देताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स निराभिमा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, शहाजीनगर, मुक्काम पोस्ट-रेडनी, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांचा कार्यरत असलेला ३,५०० टन प्रतिदिन क्षमतेचा साखर कारखाना, १८.० मेगावॅट क्षमतेचा सहवीज प्रकल्प आणि ३०.० किलो लिटर प्रतिदिन मळीवर आधारित आसवणी प्रकल्पात प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाच्या ३०.० किलो लिटर प्रतिदिन ते १०५.० किलो लिटर प्रतिदिन विस्तारीकरण प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २४-०८-२०२० रोजी अर्ज सादर केला. प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ३१-१०-२०१९ रोजी काही अटी व शर्ती निर्देश करुन मानक पर्यावरण आघात रुपरेषा करण्यास (स्टॅंडर्ड टीओआर- टर्म्स ऑफ रेफरन्स) प्राथमिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांनी सदरहू प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी दिनांक १५-०४-२०२१ रोजी आयोजित करण्यास मान्यता दिलेली होती. त्याबाबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर जाहीर सूचना ही स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीच व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ०९-०३-२०२१ रोजी प्रकाशित करण्यात आलेली होती. मात्र कोविड साथीच्या रोगाच्या प्रार्दुभावामुळे सदरहू जनसुनावणी ही स्थगित करण्यात आली. त्याबाबतची जाहीर सूचना ही ०९-०४-२०२१ रोजी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत प्रकाशित करण्यात आलेली होती.

त्यानंतर सदरहू जनसुनावणी दिनांक ०२-०७-२०२१ रोजी आयोजित करण्यास मा. जिल्हाधिकारी, पुणे यांनी मान्यता दिल्यानंतर जनसुनावणीबाबतची जाहीर सूचना ही स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २९-०५-२०२१ रोजी प्रकाशित करण्यात आलेली होती. तसेच दिनांक ३०-०५-२०२१ रोजी शुध्दीपत्र स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत प्रसिध्द करण्यात आलेले होते.

त्याचप्रमाणे कोविडच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी ही ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात येणार असल्याची पूर्व सूचना दिनांक २६-०६-२०२१ रोजी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत प्रसारित करण्यात आलेली होती.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प विस्तारिकरणाबाबतची जनसुनावणी ही आज ०२-०७-२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग झूमव्दारे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

समन्वयक यांनी सांगितले की दिनांक ०९-०३-२०२१ रोजी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत प्रसारित करण्यात आलेल्या जाहिर सूचनेनुसार प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी नोंदविण्याचे आवाहन पर्यावरणविषयक काम करणा-या संस्था, स्थानिक नागरीक यांना करण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचे पर्यावरणविषयक दस्तवेज हे खालील कार्यालयात उपल्बध करण्यात आलेले होतेः-

१) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
२) जिल्हा परिषद कार्यालय, पुणे
३) जिल्हा उद्योग केंद्र, पुणे
४) पर्यावरण व वातावरण बदल विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ३२
५) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुख्यालय, कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला,
सायन-माटुंगा स्किम मार्ग क्रं.७, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई -२२
६) झोनल कार्यलय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएट इमारत, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर § ४४० ००१
७) प्रादेशिक व उप प्रादेशिक कार्यालय-१,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,जोग सेंटर, २रा ल ३का मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे-४११ ००३
८) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय - बारामती,तालुका-बारामती,जिल्हा-पुणे
९) तहसीलदार, तहसील कार्यालय-इंदापूर, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणे
१०) गटविकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, इंदापूर, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणे
११) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय § रेडणी, भोडणी, रेडा, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणे

समन्वयक यांनी पुढे सांगितले की उपस्थितांना सदरहू प्रकल्पाबाबत काही लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते sropune1@mpcb.gov.in या मेलवर नोंदवू शकता, जेणेकरुन

सदरहू सूचना, आक्षेप अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे ज्यांना तोंडी प्रश्न नोंदवायचे आहेत, त्यांनी सादरीकरणानंतर ते नोंदवू शकता. प्रश्न उपस्थित करताना आपले नाव व गावाचे नाव स्पष्टपणे सांगावे. प्रकल्प प्रवर्तक, प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार हे त्यास उत्तरे देतील. सदरहू कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन सदरहू इतिवृत्त, अंतिम पर्यावरणविषयक आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यासाठी म.प्र.नि. मंडळाच्या मुख्यालयात पाठविण्यात येईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी समिती ही प्रकल्पाबाबत लोकांचे मत नोंदविण्यासाठी असून या समितीस कोणताही निर्णय घेण्याची किंवा शिफारस करण्याचा अधिकार नाही. जनसुनावणीत उपस्थित सूचना, मुद्दे व त्यास प्रकल्प प्रवर्तकांनी व पर्यावरण सल्लागार यांनी दिलेली उत्तरे यास अनुसरुन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन तो पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करावयाचा असतो व त्याबाबत पुढील निर्णय हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली येथील तज्ज्ञ समिती घेते. त्यांनी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पुढील कार्यवाही सुरु करण्याची विनंती केली.

डॉ. जयश्री कटारे, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व ऑनलाईन उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की प्रथम प्रकल्प विस्तारिकरणाबाबत सादरीकरण करण्यात येईल. उपस्थितांनी ज्या मुद्यांवर शंका, सूचना, आक्षेप नोंदवायचे असतील, त्या तयार ठेवाव्यात. सादरीकरणानंतर ऑनलाईन उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप नोंदविण्याची संधि देण्यात येईल. त्यांनी प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सादर करण्याची सूचना केली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाचे विस्तारीकरण व पर्यावरण व्यवस्थापन आराखड्याबाबत संपूर्ण माहिती सांगितली. त्यांनी सांगितले की कार्यरत साखर कारखान्यातील मळीचा वापर करुन आसवणी प्रकल्पाची क्षमता वाढविण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प पर्यावरण आघात अधिसूचनेनुसार संवर्ग अ मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी आगाऊ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

त्यांनी सांगितले की कोविड साथीच्या रोगामुळे सॅनिटायझरसाठी अल्कोहोलच्या मागणीत प्रचंड वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे केंद्र सरकारने पेट्रोलबरोबर ब्लेंडींगसाठी पॉवर अल्कोहोलच्या रुपात इंधन म्हणून वापरास परवानगी दिलेली आहे. परदेशातही फर्मेटेशन अल्कोहोलला मोठी मागणी आहे. त्यामुळे प्रकल्प प्रवर्तकांनी रुपये ७९.७५ कोटींची गुंतवणूक करुन आसवणी प्रकल्पाची क्षमता विस्तारिकरणाचा निर्णय घेतलेला आहे. मेक इन इंडिया या ध्येयानुसार परकीय चलन वाचविण्यासाठी अल्कोहोलचे भारतात उत्पादन करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी असे प्रकल्प केंद्र शासनाने फास्ट ट्रॅकवर घेतलेले आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा शून्य द्रव निस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज- Zero Liquid Discharge) प्रकल्प आहे. त्यांनी प्रकल्पातील स्पेंट वॉश, घनकचरा प्रकिया व विल्हेवाट, प्रकल्पातील पाण्याची बचत आणि प्रकल्पातील आपत्कालीन व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) बाबत संपूर्ण माहिती सांगितली. त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक परिसरातील विकासास व पर्यावरण संरक्षणास बांधिल असून प्रकल्प प्रवर्तक मानकांपेक्षा जास्त झाडे प्रकल्पात विकसित करणार आहेत. त्याचप्रमाणे जपानी तंत्रज्ञान वापरुन प्रकल्पात (दायकी एक्सीस) घरगुती सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा (Sewage Treatment Plant) कार्यान्वित करण्यात येईल.

सादरीकरणानंतर पर्यावरणविषयक समितीने उपस्थितांना त्यांचे काही प्रश्न असल्यास त्या उपस्थित करण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रतिनिधींकडून/प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **<u>श्री ज्ञानेश्वर शिवाजीराव मानेदेशमुख, राहणार- मुक्काम पोस्ट-लुमेवाडी, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणेः-</u>**

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | आसवणी प्रकल्पाच्या विस्तारिकरणामुळे सांडपाण्याच्या निर्मितीत वाढ होईल. त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल? त्याचा परिसरात काही त्रास होईल काय? | प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर उत्पन्न होणारा द्रवरुप स्पेंट वॉश हा संपूर्णपणे जाळण्यात येणार आहे. म्हणजे द्रवरुप स्पेंट वॉशचे राखेत रुपांतर होणार आहे. जर १०० लिटर स्पेंट वॉश असेल तर १०.० किलो राख तयार होते. त्यामुळे कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याबाबत आपण निश्चिंत राहावे. |

२) **श्री वसंत हरिभाऊ घोगरे, राहणार- मुक्काम पोस्ट-सुरवड, तालुका- इंदापूर, जिल्हा- पुणेः-**

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | सदरहू आसवणी विस्तारिकरण प्रकल्पामुळे सभासदांना काय फायदा होईल? | अ)पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की उप-उत्पादने (by products) वाढली की उत्पन्नात वाढ होते. आता साखरेला उठाव नाही. अल्कोहोलला जास्त चांगला भाव येतो. त्यामुळे कारखान्याला आर्थिक फायदा होऊ |

| | | |
|---|---|---|
| | | शकतो. जास्तीतजास्त गाळपामुळे जास्तीतजास्त मळीपासून अल्कोहोल निर्माण करता येईल. त्यामुळे सर्व सभासदांचा फायदा होईल. |
| | | ब)त्याचवेळी प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक यांनी उत्तर दिले की इथेनॉल उत्पादनामुळे कारखान्याचा आर्थिक फायदा होऊन शेतक-यांच्या ऊसाला जादा भाव देता येणार आहे |
| | | क)त्याचप्रमाणे आसवणी प्रकल्प क्षमता विस्तारिकरणामुळे अतिरिक्त ५० व्यक्तींना रोजगाराची संधि उपलब्ध होणार आहे. |

३) श्री दिपक रविंद्र कांबळे, राहणार-मुक्काम पोस्ट-बावडा, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणेः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | प्रकल्प विस्तारिकरणामुळे हवा प्रदूषण होईल. हवा प्रदूषण नियंत्रणासाठी प्रकल्पात काय उपाययोजना करण्यात येतील? | प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की हवा प्रदूषण होणा-या घटकात म्हणजे इन्सिनरेशन बॉयलरमध्ये स्पेंटवॉश जाळणार आहोत. त्यात ८०% स्पेंटवॉश व २०% कोळसा असे प्रमाण असते. त्यास ईएसपी ही सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. ती ९९.५% एवढी क्षमता सिध्द करते. त्यामुळे राख ही बाहेर जाणार नाही. त्याचप्रमाणे ६२ मीटर्सची चिमणी बसविणार असल्याने कोणत्याही प्रकारच्या हवा प्रदूषणाचा त्रास होणार नाही. तसेच यास Online Continuous Monitoring System कार्यान्वित करण्यात येणार आहे, जी केंद्रीय व मप्रनि मंडळाच्या सर्व्हरला जोडण्यात येते. त्यामुळे परिसरात त्रास होण्याअगोदरच संबंधित यंत्रणेकडून कारखान्यास सूचना मिळते. त्यामुळे परिसरात हवा प्रदूषणाचा त्रास होणार नाही. |
| | त्यावेळी याची १००% हमी देता का अशी विचारणा केली. | प्रकल्पात ऑनलाईन सयंत्रणा कार्यन्वित करण्यात येणार असल्यामुळे पर्यावरण सल्लागार यांनी १००% हमी दिली. |

४) श्री सुभाष घोगरे, राहणार-मुक्काम पोस्ट-बावडा, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणेः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | या आसवणी प्रकल्पात कोणकोणते उप-पदार्थ तयार केले जातील? | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आसवणी प्रकल्पात प्रथम रेक्टिफाईड स्पिरिट तयार होते. त्यापासून एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल तयार करता येते. इथेनॉल करता येते. त्यापासून फ्युझेल ऑईल मिळते. कार्बन डाय ऑक्झाईड मिळतो, इ.पदार्थ व उप-पदार्थ तयार होतात. |

५) श्री राजाराम महादेव पोळ, कारखाना सभासद, राहणार-मुक्काम पोस्ट-निरवांगी, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणेः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | आसवणी प्रकल्प विस्तारीकरणामुळे उत्पन्न होणा-या घन कच-याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल? त्यापासून काही प्रदूषण होईल काय? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की - आसवणी प्रकल्पातील घन कचरा म्हणजे फर्मेनेटशनमध्ये यीस्ट स्लज तयार होतो. तो काढून इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येईल. दुसरा घन कचरा म्हणजे इन्सिनरेशन बॉयलरची जी राख असते, ती वीटभट्टी धारकांना पुरविण्यात येईल किंवा आम्ही वीटभट्टी कारखाना चालू करु शकतो. |

६) श्री मालोजी वसंतराव शिंदे, कारखाना सभासद, राहणार-मुक्काम पोस्ट-ओझरे, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणेः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | सदरहू आसवणी प्रकल्प वर्षात किती दिवस कार्यान्वित राहील? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आसवणी प्रकल्प इन्सिनरेशन बॉयलरमुळे पूर्ण वर्ष कार्यान्वित ठेवता येईल. पूर्वी कंपोस्ट यार्ड असल्याने पावसाळ्यात बंद ठेवावा लागे. आता इन्सिनरेशन बॉयलर कार्यान्वित केल्यानंतर आसवणी प्रकल्प हा वर्षभर चालू ठेवता येतो. |

७) श्री जयानंद बंडगर,मु.पो.पिठेवाडी, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणेः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | विस्तारिकरणामुळे आसवणी प्रकल्पास किती लिटर पाणी लागेल? ते कसे उपलब्ध करण्यात येईल? | विस्तारीकरणामुळे सुमारे १११८.० घनमीटर पाणी लागेल. त्यापैकी स्वच्छ २७७ घनमीटर प्रती दिन पाणी भिमा नदीमधून घेतले जाईल व उर्वरित पाण्याची गरज प्रक्रियाकृत केलेले सांडपाण्यामधून भागवण्यात येईल. ८३७ घनमीटर प्रती दिन हे सीपीयू मधून प्रक्रिया करुन व ०७ घनमीटर प्रती दिन हे घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेतुन प्रक्रिया करुन पुर्नवापर करण्यात येईल. |

८) श्री दत्तू भोसले, राहणार-वकील वस्ती, तालुका - इंदापूर, जिल्हा-पुणेः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | प्रकल्प विस्तारिकरणामुळे रोजगाराच्या संधित वाढ होणार काय? | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की विस्तारिकरणामुळे रोजगाराच्या संधित वाढ होईल. |

९) श्री भागवत खंडेराव पाटील, राहणार-मुक्काम पोस्ट-निमगाव केतकी, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणेः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | आसवणी प्रकल्प विस्तारिकरणामुळे होणारे फायदे बघता या प्रकल्पास आमचा पाठिंबा असून सदरहू प्रकल्प लवकरात लवकर व्हावा ही विनंती. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

१०) श्री रामचंद्र मारुती घोरपडे, राहणार-मुक्काम पोस्ट- बावडा, तालुका-इंदापूर, जिल्हा-पुणेः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पास आमची मान्यता आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

११) श्री मालोजीराजे वसंतराव शिंदे, राहणार-भोसरे, तालुका- इंदापूर, जिल्हा- पुणेः-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | या प्रकल्पापासून सभासदांना फायदा होणार आहे, तर या प्रकल्पास आमची मान्यता आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली |

१२) श्री एच. मधुबाबू,सामाजिक कार्यकर्ता, अध्यक्ष, रुरल एन्व्हॉयरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी,मुशीराबाद, हैद्राबादः-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | मी २-३ सूचना करत आहेः-<br><br>अ) प्रदूषण नियंत्रणासाठी झाडे लावण्यात यावीत. योग्य झाडे लावल्याने धुळीचे प्रदूषण रोखता येईल<br>ब) स्थानिक युवक, युवतींना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे<br>क) सीएसआर आणि सीईआर निधी हा बाधित क्षेत्रातच खर्च करणे योग्य आहे.<br>ड) प्रकल्पास पाठिंबा देत असून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार. नवी दिल्ली यांना प्रकल्पास मान्यता देण्यासाठी विनंती | पर्यावरण सल्लागार यांनी उपस्थित केलेल्या सर्व सूचनांचा<br>पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नोंद घेतलेली असल्याची माहिती दिली. |

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती आणि अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ऑनलाईन उपस्थित असणा-यांना त्यांच्या काही हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांनी नोंदविलेल्या आक्षेपकांना योग्य प्रकारे उत्तरे देण्यात आलेली असून त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामुळे त्याव्यतिरिक्त जर कोणाला आक्षेप, सूचना नोंदवायच्या असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात.

१३) श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण परिरक्षणा संस्था, जिल्हा- नालगोंडा, तेलंगणा राज्यः-

| अनु.क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी यांनी इंग्रजीत सांगितले की ते भारतातील सर्वात प्रथम असे पर्यावरणवादी आहेत की जो औद्योगिक विकासाचा आग्रह करत असतो. पर्यावरणवादी हे उद्योगांना विरोध करतात. पण मी नेहमी उद्योगविकासाचे समर्थन करतो. त्यांनी आसवणी विस्तारिकरणाबद्दल प्रकल्प प्रवर्तकांचे अभिनंदन केले.त्यांनी सांगितले की पर्यावरण संरक्षण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ते काही सूचना देऊ इच्छितातः-अ) पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाचे पाणी,हवा, जमिन यांचे आधारभूत सर्वेषण केलेले आहे. ते चांगले केलेले आहे. माझी विनंती आहे की कृपया प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील जनतेची आरोग्याची सद्यस्थिती, पीक उत्पादनाची सद्यस्थिती व भूगर्भातील पाण्याची सद्यस्थिती याचा अहवाल तयार करण्याची सूचना केली. पर्यावरण समतोल अभ्यासासाठी त्याचा उपयोग होईल,<br>ब) त्यांनी प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा दिलेला असून त्यांनी लेखी सूचना उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ कार्यालयास ईमेलव्दारे परत सादर करणार असल्याची माहिती दिली,<br>क) त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सुरक्षितता व पर्यावरण संरक्षण करण्याची सूचना केली<br>ड) श्री रेड्डी यांना पर्यावरण सल्लागार यांचे योग्यप्रकारे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.<br>इ) श्री रेड्डी यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस प्रकल्पास बिनशर्त परवानगी प्रदान करण्याची शिफारस पर्यावरण,वने व हवामान बदल विभागास करण्याची विनंती केली. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ऑनलाईन उपस्थित असणा-यांना त्यांच्या काही हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे परत आवाहन केले.

उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थितांकडून प्रतिसाद नाही, म्हणजे त्यांच् प्रश्न संपले असे पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती समजते. त्यांनी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीत सादरीकरण केल्यानंतर उपस्थितांनी विचारलेल्या शंका, प्रश्न यास पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिलेली आहेत. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. आता कोणाच्याही शंका नाही असे दिसून येते. तरीही जरी कोणाचे प्रश्न असल्यास मप्रनि मंडळाच्या स्थानिक कार्यालयाच्या ईमेलवर ते पाठविल्यास त्याची नोंद घेण्यात येऊन शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतील.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की या ऑनलाईन जनसुनावणीसाठी ७८ नागरिक ऑनलाईन जोडलेले होते व त्यांपैकी १३ लोकांनी सूचना, शंका उपस्थित केलेल्या आहेत. अध्यक्षा यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना सीईआर/कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधी (Corporate Environment Responsibility Fund) बाबत स्प्टीकरण विचारताना मत मांडले की जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेऊन सीईआर निधी वापरणे अपेक्षित असताना पर्यावरण सल्लागार यांनी २०१८ च्या परिपत्रकाचा उल्लेख करुन जो २% उल्लेख केलेला आहे त्याबाबत सविस्तर उत्तर देण्याची सूचना केली. त्यावेळी प्रकल्प सल्लागार हे सीएसआरबाबत माहीती देऊ लागले असताना अध्यक्षा यांनी सीईआरबाबत संपूर्ण माहिती देण्याची सूचना केली. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांच्या महिला सहायकांनी माहिती दिली की सीईआरबाबत मे, २०१८ ची जी अधिसूचना होती, त्यानंतर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी नविन मार्गदर्शक तत्वे प्रकाशित केल्यानुसार जाहिर जनसुनावणीत केलेल्या मागणीनुसार नंतर निधी निश्चत करुन खर्च करण्याची तरतुद केलेली आहे. त्यांनी सांगितले की त्यानुसार पर्यावरण जबाबदारी निधी प्रकल्पासाठी खर्च करण्यात येईल. अध्यक्षा यांनी मत मांडले की मुळात सीईआरचा प्रारुप आराखडा येथे देणे आवश्यक होते. तरी ती माहिती सामाईक/शेअर करण्याची सूचना केली. पर्यावरण सल्लागार यांनी याबाबत आश्वासित केले.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्पाचे अधिकारी, प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार व ऑनलाईन जोडलेल्या सर्वांचे आभार मानून जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षा यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

(प्रताप जगताप)
समन्वयक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, पुणे-१

(नितीन शिंदे)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, पुणे

(डॉ. जयश्री कटारे)
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी - पुणे
जिल्हा-पुणे